# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

**भा.स.मा. शिष्यवृत्ती किंवा फ्रिशीप सूचना** दि. 26/10/2023

---

**शै.वर्ष**. 2023-24 मधील S.C., S.T., VJNT, SBC व OBC संवर्गातील विद्यार्थ्यांना सूचीत करण्यात येते की, भारत सरकार मागासवर्गीय **शिष्यवृत्ती किंवा फ्रिशीपधारक** योजनेचे ऑनलाईन फॉर्म भरणे सुरू झालेले आहेत. तरी संबंधीत विद्यार्थ्यांनी भा.स.मा. शिष्यवृत्ती किंवा फ्रिशीप योजनेचा ऑनलाईन फॉर्म www.mahadbt.gov.in या वेबसाईडवर भरून त्यांची प्रिंट आऊट काढून त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून **दि**. 30/11/2023 पुर्वी कार्यालयातील शिष्यवृत्ती विभागात जमा करावेत. **योजनेच्या नियम, अटी व फॉर्म सोबत जोडाव्याच्या कागदपत्राची यादी कार्यालयाच्या समोरील नोटीस बोर्ड क्रंमाक. 2 वर लावण्यात आलेली आहे**. संबंधीत विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

तसेच शिष्यवृत्ती ऑनलाईन फॉर्म कमी दरामध्ये भरण्याची सोय महाविद्यालयाने महाविद्यालयातच एका खाजगी एजन्सीकडे देण्यात आलेले आहे. तरी ईच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील झेरॉक्स सेंटरवर संपर्क साधून ऑनलाईन फॉर्म भरून घेवून त्यांची प्रिंट आऊट संबंधीत एजन्सीकडून घेवून त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून वरील मुदतीत शिष्यवृत्ती विभागात जमा करावेत.

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
(स्वायत्त)

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## शै.वर्ष. 2023-24 मधील भा.स.मा. शिष्यवृत्ती किंवा फ्रिशीप योजनेच्या नियम अटी व लागणाऱ्या कागदपत्राची यादी खालील प्रमाणे आहे.

**फॉर्म सोबत जोडावयाची कागदपत्राची यादी.**

1) महाविद्यालयाचे बोनाफाईड मुळ (Original ) प्रमाणपत्र.

2) गत वर्षीची टि.सी. झेरॉक्स प्रत.

3) S.S.C. पासून पुढील सर्व मार्कमेमोच्या झेरॉक्स प्रति.

4) जात प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.

5) तहसीलदाराने दिलेले 3 वर्षाच्या आतील रहिवाशी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत.

6) तहसीलदाराने दिलेले आर्थीक वर्ष 2022-23 चे मुळ प्रमाणपत्र.
**जर वडील हयात नसतील तर आईचे उत्पन्न प्रमाणपत्र व आई व वडील दोघेही हयात नसतील तर पालकाचे प्रमाणपत्र जोडणे व त्यासोबत मृत्युप्रमाणपत्र जोडावेत.**

7) विद्यार्थ्यांनी आपल्या Profile मधून गतवर्षी शिष्यवृत्ती मंजूरीचा My Scheme History काढून जोडावे.

8) शैक्षणीक किंवा शिष्यवृत्ती गॅप असेल तर बॉण्ड पेपर वर गॅप नोटरी करून मुळ बॉण्ड फॉर्म सोबत जोडणे.

9) बँक लिंक स्टटेसवर जी बँक लिंक आहे त्या बँकेच्या पासबुकच्या पहिल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत आहे. **(पासबुकवर खाते क्रंमाक, IFSC Code विद्यार्थ्यांचे नाव असावे)**

10) आधार कार्ड झेरॉक्स प्रत जोडणे. **(आधार कार्डवर जन्म तारीख, विद्यार्थ्यांचे नाव शैक्षणीक रेकॉर्ड प्रमाणे असावे. नसेल तर फॉर्म भरण्यापूर्वी Update करून घ्यावे.)**

11) आधारच्या वेबसाईडवरून बँक लिंक स्टटेस काढून जोडणे.

12) **OBC, VJNT व SBC** संवर्गातील विद्यार्थ्यांनी राशनकार्डची झेरॉक्स प्रत जोडावी. राशन कार्डवर कुंटुंबातील सर्व सदस्याची नावे असणे अनिवार्य आहेत नसतील तर टाकून घेणे अनिवार्य आहे.

13) **OBC, VJNT व SBC** संवर्गातील पालक लाभार्थी प्रमाणपत्र जोडावे.

14) महाविद्यालयाच्या प्रवेश पावतीची झेरॉक्स प्रत.

15) महाविद्यालयाच्या ओळख पत्राची झेरॉक्स प्रत.

| उत्पन्न मर्यादा. | भा.स.मा. शिष्यवृत्ती | भा.स.मा. फ्रिशीप |
|---|---|---|
| 1) S.C. व S.T. | 2.50 लाख किंवा त्यापेक्षा कमी | 2.50 लाख पेक्षा जास्त |
| 2) VJNT, OBC व SBC | 1.50 लाख किंवा त्यापेक्षा कमी | 1.50 लाख ते 8 लाखापेक्षा कमी |

**योजनेच्या नियम व अटी :**

1) जे विद्यार्थी D.Ed. B.Ed., Pol. Tech. Engineering, Agri, Law, B.Pharm. D.Pharm. G.N.M या सह अन्य कोणताही व्यवायीक कोर्स किंवा डिप्लोमा पुर्ण किंवा अपुर्ण करून त्या व्यवसायीक कोर्सला शिष्यवृत्ती किंवा फ्रिंशीपचा लाभ घेतला असल्यास चालू अभ्याक्रमाध्ये शिष्यवृत्ती किंवा फ्रिशीप योजना मंजूर होणार नाही.
2) एखादा अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती घेवून अर्धवट सोडून वेगळया संमातर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर असे विद्यार्थी या योजनेसाठी पात्रा नाहीत.
3) चालू अभ्यसक्रमासाठी पुर्नप्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांला या योजनेचा लाभ मिळणार नाही.
4) डब्बल P.G. करणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणार नाही.
5) इतर राज्यातील रहिवाशी विद्यार्थ्यांना संबंधीत योजनेचा लाभ मिळणार नाही.
6) 75% किंवा त्यापेक्षा कमी हजेरी असणा-या व दोन्ही सेमीस्टरचे परिक्षा फॉर्म न भरणा-या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. सदरील योजना मंजूर झालेली असली तरी हजेरी कमी या कारणाने योजना मंजूर रक्कम परत करावी लागेल.
7) BCA, B.Sc.C.S. M.Sc.C.S. वर्गातील VJNT, SBC व OBC संवर्गातील विद्यार्थ्यांना वरिल दोन्ही योजना लागू नाही. तसेच BCA करून M.Sc.C.S. वर्गास प्रवेश घेतल्यास सदरील योजना लागू नाही. तरी संबंधीत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती किंवा फ्रिशीपचा फॉर्म भरू नये.
8) B.A. (CEP), B.Com.(N.G.) व B.Sc.(N.G.) वर्गातील विद्यार्थ्यांनी फॉर्म भरताना Course Type हे Unaided टाकून फॉर्म भरावा.

**टिप :**

1) S.C. & S.T. संवर्गातील BCA, B.Sc.C.S. M.Sc.C.S वर्गातील विद्यार्थ्यांनी फॉर्म भरताना सर्व कागदपत्रे मुळ (Orignal) स्कॅन करावेत.
2) **फ्रिशीप** फॉर्म भरणा-या विद्यार्थ्यांनी फॉर्म भरताना सर्व कागदपत्रे मुळ (Orignal) स्कॅन करावेत.
3) शैक्षणिक कागदपत्रे, आधारकार्ड, बँक पासबुक वरील नाव, जात प्रमाणपत्रावरील नाव, रहिवाशी नावातील स्पेलींग व बँक खात्यावरील स्पेलींग हे सारखेच असावे जर विभिन्न असेल तर फॉर्म भरण्यापुर्वी दुरूस्त करून घ्यावे.
4) सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती किंवा अन्य कोणत्याही योजनेचा शिष्यवृत्ती फॉर्म भरल्यास सदरील योजनेचा फॉर्म भरू नये.

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
(स्वायत्त)